दिनांक :- 7/ 1/२०२१

प्रति,

मा. प्राचार्य साहेब,

ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर

ता. मुखेड जि.नांदेड

विषय:- <u>कार्यक्रमासाठी परवानगी मिळणे बाबत....</u>

महोदय,

वरील विषयी विनंती पूर्वक अर्ज करण्यात येतो की, महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने वतीने दिनांक ..13-1-2021..... रोजी सायं न.वा. अभ्यासिका डिजिटल.वर..व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून हा उपक्रम घेण्यास प्राचार्य साहेबांनी परवानगी द्यावी .ही नम्र विनंती .

Principal
Gramin Arts. Comm. & Science
Mahavidyalaya Vasantnagar (Kotgyal)
Tq. Mukhed Dist. Nanded (M.S)

आपला विश्वासू

प्रा. डॉ. पंडित आनंदराव शिंदे
मराठी विभाग प्रमुख
संशोधन मार्गदर्शक
ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर,
ता. मुखेड जि. नांदेड

सुचना दि. 8-1-2021

मराठी विभागातील प्राध्यापकांना सुचित करण्यात येते की, प्राचार्य साहेबांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन चर्चासत्र (वेबिनार) घेण्यासाठी ग्रंथालय विभागात दि. 8-1-2021 रोजी ठिक 3.00 वाजता उपस्थित रहावे.

कविता लोहार.

प्रा. डॉ. पंडित शिंदे

प्रा. डॉ. पंडित आनंदराव शिंदे
मराठी विभाग प्रमुख
संशोधन मार्गदर्शक
ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर,
ता. मुखेड जि. नांदेड

स्थापना - 1991 कार्यालय :- 28002 ,भ्रमणध्वनी :- 9423076156

विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर संचलित..

# ग्रामीण (कला ,वाणिज्य व विज्ञान ) महाविद्यालय ,वसंतनगर

कोटग्याळ ता.मुखेड जि.नांदेड - 431715

स्वा.रा.ती.म.वि.नांदेड संलग्न (नॅक मानांकित)

अध्यक्ष :- कि.म.राठोड सचिव :- गंगाधर गो. राठोड प्राचार्य :- डॉ.हरिदास राठोड

जा.क्र. दिनांक :- 04 जाने 202

प्रति,

मा. प्राचार्य

सौ स्मिता रावसाहेब देशमुख

शिवाजी (कला व वाणिज्य महाविद्यालय

अमरावती

विषय :- व्याख्याते म्हणून उपस्थित राहणे बाबत...

महोदय,

वरील विषयी आपणास विनंती करण्यात येते की, मराठी विभागाच्या वतीने दिनांक 13/1/2021 रोजी घेण्यात येत असलेल्या कार्यक्रमास आपण प्रमुख व्याख्याते/पाहुणे म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना/प्राध्यापकांना मार्गदर्शन करावे.

ही नम्र विनंती.

आपला विश्वासू

[signature]

4G G 12.5K/s ··· 11:49 AM 71%

← Jijau Jayanti We...

विमुक्त जाती सेवा समिती, वसंतनगर संचलित

**ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय,**

वसंतनगर (कोटग्याळ) ता. मुखेड

**मराठी विभाग**

आयोजित



**राजमाता जिजाऊ जयंती निमित्त**

राज्यस्तरीय ई-चर्चासत्र (वेबिनार)

विषय

# स्वराज्य जननी जिजामाता

**YouTube Link**

https://tinyurl.com/JijauJayantiWebinar

बुधवार, दिनांक १३ जानेवारी, २०२१ दुपारी १:०० वाजता





अध्यक्ष

**डॉ. एच.बी. राठोड**

प्राचार्य,
ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान)
महाविद्यालय, वसंतनगर
ता. मुखेड जि. नांदेड

प्रमुख वक्त्या

**डॉ. स्मिता रावसाहेब देशमुख**

प्राचार्या, श्री शिवाजी कला व
वाणिज्य महाविद्यालय, अमरावती
तथा राजमाता जिजाऊ चित्रपट फेम अभिनेत्री

**आयोजक**

| | | |
|---|---|---|
| डॉ. पंडित शिंदे | डॉ. सौ. कविता लोहाळे | प्रा. संजय पाटील |
| मराठी विभाग प्रमुख | मराठी विभाग | संगणकशास्त्र विभाग प्रमुख |
| मो. ९६२३८७७७३८ | मो. ९८९०८८०१९२ | मो. ९८९०४६१४९६ |

महाविद्यालय ... ग्रंथालय

प्रजावाणी ■ शुक्रवार, दि. १५ जानेवारी २०२१ ■

# राजमाता जिजाऊंच्या प्रेरणादायी कार्यामुळे महिलांना सन्मान

## अभिनेत्री डॉ. स्मिता देशमुख यांचे प्रतिपादन

मुखेड (वार्ताहर), दि. १४:- राजमाता जिजाऊंच्या प्रेरणादायी कार्यामुळे महिलांना सन्मान मिळत आहे असे प्रतिपादन अमरावती येथील श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या तथा राजमाता जिजाऊ चित्रपट फेम अभिनेत्री डॉ. स्मिता रावसाहेब देशमुख यांनी केले.

ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर ता. मुखेड जि. नांदेड येथील मराठी विभागाद्वारे जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून 'स्वराज्यसंकल्पिका राजमाता जिजाऊ मासाहेब आणि सद्यस्थिती' या विषयावर आयोजित एक दिवसीय राज्यस्तरीय ई चर्चासत्र (वेबिनार) प्रसंगी प्रमुख व्याख्यात्या म्हणून बोलताना केले.

अभिनेत्री डॉ. देशमुख यांनी सांगितले की इतिहासाच्या काल पटलावर अग्रणी असलेले नाव म्हणजे राजमाता जिजाऊ मासाहेब आज चारशे शतकानंतर देखील त्यांच्या कार्यातून आपल्याला प्रेरणा मिळते. स्त्री जातीचा मानसन्मान करायचे संस्कार जिजाऊंनी शिवरायांना दिले होते. मानवधर्माची जपणूक करा, सर्वधर्मसमभाव पाळा, आपल्या मातृभूमीचे रक्षण करा, रयतेचे कल्याण करा अशी शिकवण जिजाऊ मासाहेबांनी दिली होती. एक माणूस एक व्यक्ती म्हणून जिजाऊसाहेबांच्याकडे आपण पाहिले पाहिजे.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. डॉ. हरिदास राठोड म्हणाले की आजच्या पिढीने पहिल्यांदा प्रश्न समजून घेतले पाहिजेत व ते कसे सोडवावेत हे जिजाऊ चरित्रातून शिकले पाहिजे. आज प्रत्येक विषयात शाखा उपशाखा तयार झाल्या असून त्या त्या शाखा उपशाखांचे अभ्यासक असल्याचे दिसतात पण जिजाऊ आईसाहेब सर्व शाखांच्या प्रमुख होत्या. सर्व स्तरावरील आपती व्यवस्थापन कसे करावे याचे आदर्श उदाहरण त्या होत्या आज जर आपण समाजाकडे जिजाऊ आईसाहेबांच्या नजरेने पाहिले तर समाजातील अनेक प्रश्न निकाली निघतील, ती दृष्टी आपल्यात येणे गरजेचे आहे आपल्या मुलांवर व समाजावर जिजाऊंनी संस्कार केले व आजच्या वक्त्यांनी व्याख्यानाच्या माध्यमातून आमच्यावर संस्कार केले अति व्यस्त कार्यक्रमातून प्राचार्य डॉ. सौ. स्मिता देशमुखताईंनी आम्हास वेळ दिल्याबद्दल त्यांच्याप्रत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच सदरील चर्चासत्र घडवून आणण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार कर्मवीर किशनराव राठोड संस्थेचे विद्यमान सचिव प्राचार्य गंगाधर राठोड, विद्यमान आमदार डॉ. तुषार राठोड संस्थेचे सदस्य तथा जि. प. सदस्य संतोष भाऊ राठोड यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रोफे. डॉ. पंडित शिंदे यांनी केले. ते आपल्या प्रास्ताविकात म्हणाले की राजमाता राष्ट्रमाता जिजाऊंना केवळ शिवराय व संभाजी राजे यानाच घडविले नाही तर महाराष्ट्र व पर्यायाने देश घडविण्याचे काम केले.

ग्रंथालय
ता. मुखेड



# जिजाऊंची संवेदना समजून मार्गक्रमण करा-डॉ.देशमुख



**मुखेड/ प्रतिनिधी**

इतिहासाच्या काल पटलावर अग्रणी असलेले नाव म्हणजे राजमाता जिजाऊ मासाहेब. आजही त्यांच्या कार्यातून आपल्याला प्रेरणा मिळते. स्त्री जातीचा मान सन्मान करायचे संस्कार जिजाऊ साहेबांनी शिवरायांना दिले होते. मानवधर्माची जपणूक करा, सर्वधर्मसमभाव बाळगा, आपल्या मातृभूमीचे रक्षण करा, रयतेचे कल्याण करा अशी शिकवण जिजाऊ मा साहेबांनी दिली होती. त्यांचे चरित्र केवळ मातृत्वाच्या चौकटीत संकुचित करू नये. एक माणूस एक व्यक्ती म्हणून जिजाऊसाहेबांकडे आपण पाहिले पाहिजे.जिजाऊंची संवेदना समजून घेऊन मार्गक्रमण करा असे प्रतिपादन अमरावती येथील श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या तथा राजमाता जिजाऊ चित्रपट फेम अभिनेत्री डॉ. स्मिता रावसाहेब देशमुख यांनी केले.

मुखेडच्या ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर येथील मराठी विभागाद्वारे जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून 'स्वराज्यसंकल्पिका राजमाता जिजाऊ मासाहेब आणि सद्यस्थिती' यावर राज्यस्तरीय ई चर्चासत्र ( वेबिनार ) प्रसंगी प्रमुख व्याख्यात्या म्हणून त्या बोलत होत्या.

डॉ.देशमुख म्हणाल्या की, जिजाऊमध्ये विचारांची ताकद निर्माण करण्यात त्यांच्या आई वडिलांचा महत्त्वाचा वाटा होता. जिजाऊंना लहानपणापासून आई -वडिलांनी शौर्याचे व स्वसंरक्षणाचे धडे दिले. त्यांना मराठी भाषेबरोबरच कानडी, तेलगु, गुजराती, फारसी, उर्दू या भाषा अवगत होत्या. ज्यांना जास्त भाषा समजतात तो व्यक्ती समृद्ध असतो. आई साहेबांकडे कम्युनिकेशन स्किल होते. त्यांना तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, कृषीशास्त्र, जलसंधारण,इतिहास, भूगोल व सर्व धर्मग्रंथांचे ज्ञान होते. त्यांना वाचन, चिंतन व मननातून अनेक प्रश्न पडायचे. धर्म म्हणजे काय? समाजात अन्याय का केला जातो? त्यांना समाजातील समस्या दिसायच्या व त्या सोडविण्यासाठीची तळमळ असायची. त्यांनी रयतेचा संसार केला. जिजाऊ विवेक मूर्ती होत्या. त्या समाज व माणूस वाचत असत म्हणून त्यांना कुठे कोणत्या माणसाकडून कोणते काम करून घ्यावे हे अवगत होते.

आज त्याचा अभाव दिसतो आहे. आपण आज स्त्री -पुरुष लिंगभेद करतो पण जिजाऊबाबत हा लिंगभेद केला गेला नव्हता व त्यांनी ही हा भेद केला नाही. स्त्रियांवर झालेले अत्याचार त्यांना सहन होत नसत. अत्याचार करणाऱ्याला कठोरातली कठोर शिक्षा त्या करत. तेच संस्कार राजे छत्रपती शिवरायांवर केल्यामुळे राजांनी रांझाच्या पाटलाने स्त्रीवर अत्याचार केल्यावर ते म्हणाले होते की, त्याला अशी शिक्षा करा की, त्याच्या शरिराचा चौरंग करा म्हणजे तुकडे करा. आज समाजात स्त्रियांवरील अत्याचार वाढताहेत. तसेच शेतकरी आत्महत्या व अन्य प्रश्न उपस्थित होत आहेत. त्याला उत्तर हे केवळ जिजाऊ चरित्रातून मिळू शकते. ते शोधून आपण सद्यस्थितीत स्वराज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संकटांनी कोलमडून जायचे नसते हा संदेश त्यांचे चरित्र आपल्याला देते. त्यामुळे युवकांनी संकटांना घाबरू नये. आत्महत्येचा विचार मनात आणू नये. व्यसनापासून दुर राहावे. शेतकरी व बहुजनांना उभे करण्याचे काम त्यांनी केले. जिजाऊंना समजून घ्यावयाचे असेल तर आपणास जिजाऊंची संवेदना समजून घ्यावी लागेल व त्यानुसार वर्तन करावे लागेल तरच समाज योग्य दिशेने जाऊन सुराज्य निर्माण होईल.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. हरिदास राठोड म्हणाले की आजच्या पिढीने पहिल्यांदा प्रश्न समजून घेतले पाहिजेत व ते कसे सोडवावेत हे जिजाऊ चरित्रातून शिकले पाहिजे. आज प्रत्येक विषयात शाखा उपशाखा तयार झाल्या असून त्या त्या शाखा उपशाखाचे अभ्यासक असल्याचे दिसतात, पण जिजाऊ आईसाहेब सर्व शाखांच्या प्रमुख होत्या. सर्व स्तरावरील आपत्ती व्यवस्थापन कसे करावे याचे आदर्श उदाहरण त्या होत्या. आज जर आपण समाजाकडे जिजाऊ आईसाहेबांच्या नजरेने पाहिले तर समाजातील अनेक प्रश्न त्रिकाली निघतील. ती दृष्टी आपल्यात येणे गरजेचे आहे. आपल्या मुलांवर व समाजावर जिजाऊंनी संस्कार केले व आजच्या वक्त्यांनी व्याख्यानांच्या माध्यमातून आपल्यावर संस्कार केले. हे चर्चासत्र घडवून आणण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार कर्मवीर किशनराव राठोड, संस्थेचे विद्यमान सचिव प्राचार्य गंगाधरराव राठोड, आमदार डॉ.तुषार राठोड,संस्थेचे सदस्य तथा जि. प. सदस्य संतोष राठोड यांनी मार्गदर्शन केले. त्याबद्दल त्यांचा हा मी आभारी आहे.

प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रो.डॉ. पंडित शिंदे यांनी केले. ते म्हणाले की राजमाता,राष्ट्रमाता जिजाऊंनी केवळ शिवराय व संभाजी राजे यांनाच घडविले नाही तर महाराष्ट्र व पर्यायाने देश घडविण्याचे काम केले. संस्काराचे आदर्श उदाहरण म्हणजे मा जिजाऊ होत. त्यांचा आदर्श वर्तमानात आपल्या सर्वांसमोर मांडता यावा या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यावेळी त्यांनी प्रमुख पाहुण्यांना विस्तृत परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ही त्यांनी केले. तर आभार मराठी विभागाच्या प्रा. डॉ. सौ. कविता लोहाळे यांनी मानले.



Jijau Jayanti Webinar

353 views · 4 days ago

37 | 3 | Share | Download | Save

7:09

# About this call

People | Info

- Kavi Shankar Rathod
- Kavita Lohale
- Madhav Panchal
- Mandakini Rathod
- MANTHAN PARVA
- Namdev Gound
- Narayan Panchal
- Nitin Deshmukh
- Parshuram Shinde
- Raj Shrirame
- Raju Raj
- RAMESH SHEN

You

Dr. Mah

+54


7:09
About this call
People
Info
Nitin Deshmukh
Parshuram Shinde
Raju Raj
Ramkrishna Badne
rukhmajichivate1234 ...
Rupali Mali
S.pandit shinde
Sakharam Gore
Sambhaji zampalwad
Sanjay Patil
Sanjay Patil
Shyam Kamble
Sindhu Shinde
You
Kavita
+34

7:08

← About this call

People Info

In call

Prabha Shinde (You)

Gurunath Kalyan
Meeting host

Anand Rathod

Aniket Wadje

Arun Thorve

Chandrashekhar Kalse

Dadarao Aglave

Devidas Kendre

Dr. Mahesh Pentewar

Dr. Umakant Pa

Dr.Mahendra H

Eknath Dumne

You

Kavita +34

7:49

← About this call

People | Info

Shivaji Mundkar

Shivaji Waghmare

Shrikant Jewale

sitaram Pawar

Subhash Dethe

Subhash Kankute

Sudhir Garad

Supriya Dawkare

tanaji tate

tukaram jadhav

Vyankat Chavan

प्रा.ज्ञानेश्वर शिंदे

बालाजी भा. राठोड



7:49

# About this call

People | Info

- Raju Raj
- Ramkrishna Badne
- Rupali Mali
- S.babarao S.babarao
- S.pandit shinde
- SADASHIV GALANDE
- sahebrao shinde
- Sakharam Gore
- Sambhaji zampalwad
- Sanjay Patil
- sanjeev reddy
- satyanarayan (
- shahir Pravin J.

You

ganesh +63

7:09

About this call

People Info

Dawkare Balaji

Devidas Kendre

Dr. Mahesh Pentewar

Dr. Umakant Padamwar

Dr.Mahendra Honwad...

Eknath Dumne

Govind Pande

Haridas Rathod

janardhan darade

Kalyani Chondikar

kashinath kalyane

Kavi Shankar R

Raju Raj joined

स्थापना - 1991

कार्यालय :- 28002 ,भ्रमणध्वनी :- 9423076156

विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर संचलित..

ग्रामीण (कला ,वाणिज्य व विज्ञान ) महाविद्यालय ,वसंतनगर

कोटग्याळ ता.मुखेड जि.नांदेड - 431715

स्वा.रा.ती.म.वि.नांदेड संलग्न (नॅक मानांकित)

अध्यक्ष :- किं.म.राठोड    सचिव :- गंगाधर गो. राठोड    प्राचार्य :- डॉ.हरिदास राठोड

जा.क्र.

दिनांक :- 18 जाने 2021

# आभार पत्र

प्रति,

मा. प्राचार्य

सौ. स्मिता रावसाहेब देशमुख

शिवाजी महाविद्यालय, अमरावती

आपण आपल्या कार्यभाहूल्यातून वेळात वेळ काढून आमच्या महाविद्यालयात येवून सखोल व ज्ञानवर्धक मार्गदर्शन केले. त्या बद्दल महाविद्यालय व मराठी विभाग आपले अत्यंत आभारी आहे.

धन्यवाद...

आपला विश्वासू

प्रा. डॉ. पंडित आनंदराव शिंदे

मराठी विभाग प्रमुख

संशोधन मार्गदर्शक

ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर,

ता. मुखेड जि. नांदेड